# मिरा भाईंदर महानगरपालिका

सामान्य प्रशासन विभाग

मुख्यालय, पहिला मजला, स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)

दूरध्वनी क्र-022-28192828 ई-मेल आयडी- gad@mbmc.gov.in

जा.क्र. मनपा/ सा.प्र. /२२ /२०२५-२६ दि. ०९/०४/२०२५

## // परिपत्रक //

प्रतिवर्षाप्रमाणे शासकीय परिपत्रकानुसार **सोमवार दि. १४ एप्रिल २०२५ रोजी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती** साजरी करण्यात येणार आहे. **मा.श्री.राधाबिनोद अरिबम शर्मा (भा.प्र.से.), आयुक्त तथा प्रशासक** यांच्या शुभहस्ते व मा.अति.आयुक्त-(सा.प्र), मा.अति.आयुक्त-(कर), उपायुक्त (सर्व), शहर अभियंता, नगरसचिव, अधिकारी/कर्मचारी वर्ग व पत्रकार यांच्या उपस्थितीत भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचा कार्यक्रम संपन्न होणार आहे. त्यानिमित्त सकाळी ०९.०० वा. घोडबंदर रोड येथील छत्रपती शिवाजी महाराज यांचे अश्वारुढ पुतळयास, एम.टी.एन.एल. भाईंदर (प.) समोरील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळयांस सकाळी ०९.३० वाजता पुष्पहार अर्पण करणे. तदनंतर महानगरपालिका मुख्य कार्यालयाचे समोरील प्रांगणात सकाळी ०९.४५ वा. छत्रपती शिवाजी महाराज यांचे पुतळयास व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे अर्धाकृती पुतळयांस पुष्पहार अर्पण करण्याचा कार्यक्रम आयोजित केला आहे.

तसेच मिरा भाईंदर महानगरपालिका, मुख्य कार्यालय, दुसरा मजला येथे सकाळी ठिक १०.०० वाजता भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस **मा. श्री. राधाबिनोद अरिबम शर्मा (भा.प्र.से.), आयुक्त तथा प्रशासक** यांचे शुभहस्ते पुष्पहार अर्पण करण्यात येणार आहे.

तरी सदर कार्यक्रमास सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी उपस्थित रहावे.

Signed by
Kalpita Kishor Pimple
Date: 09-04-2025 19:38:17

**उपायुक्त (मु.)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रति,**

-----------------------------

-----------------------------